आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 30/09/2026 METRO CITY VRUTANT

> संपादक : रफी हुसेन > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 206 > RNI - MAHMAR /2021/51259 > metrocity924@gmail.com

# युवाशक्तीला संधी देऊन सक्षम राष्ट्राची निर्मिती - प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण

## 'रोजगार महाकुंभ' मधून युवकांच्या स्वप्नांना मिळाले बळ- आमदार शंकर जगताप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : तरुणांच्या हाताला रोजगार मिळवून देणे, त्यांना कौशल्य आणि नवोपक्रमाच्या बळावर पुढे जाण्यास प्रोत्साहित करणे आणि या युवाशक्तीच्या सहभागातून सक्षम, विकसित राष्ट्र घडवणे, हेच भाजपचे ध्येय आहे, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मंगळवारी केले.**




चिंचवड विधानसभा मतदारसंघामध्ये आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली नवी सांगवी येथे आयोजित 'रोजगार महाकुंभ - 2026' मध्ये ते बोलत होते. आजच्या महाकुंभमध्ये 8 हजार 157 युवक युवतींनी रोजगारासाठी नोंदणी केली. विविध कंपन्यांमध्ये या युवकांच्या मुलाखती पार पडल्या. यामध्ये 3 हजार 200 हून युवक युवतींना रोजगाराची संधी प्राप्त होणार आहे.

काही निवड झालेल्या उमेदवारांना चव्हाण यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात नियुक्तिपत्रे देण्यात आली.

नवी सांगवी येथील न्यू मिलेनियम इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आयोजित 'रोजगार महाकुंभ'च्या निमित्ताने यावेळी महापौर रवि लांडगे, आमदार महेश लांडगे, उमा खापरे, माजी आमदार अश्विनी जगताप,

भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, भाजपा सरचिटणीस मधुकर बच्चे, प्रतिभा महिला प्रतिष्ठानच्या रूपाली देवकर, विद्या गोते यांच्यासह प्रतिष्ठानच्या सदस्या उपस्थित होते.

यावेळी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले की, 2014 नंतर देशाच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी आणि व्यवस्थेतील भ्रष्टाचार व अडथळे दूर करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रयत्न केले. देशाला विकसित भारताच्या दिशेने न्यायचे असेल, तर प्रत्येक नागरिकाने राष्ट्रप्रथम ही भावना ठेवून आपले योगदान दिले पाहिजे. रोजगार मेळावे युवकांना संधी देतात; त्या संधींचे रूपांतर कौशल्य, कष्ट आणि नव्या कल्पनांच्या बळावर प्रगतीत करणे तरुणांच्या हाती आहे, असे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना चव्हाण म्हणाले, नवोपक्रमाबरोबरच अवकाश क्षेत्राशी संबंधित उद्योगांतही युवकांसाठी संधी निर्माण होऊ शकतात, याकडे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विशेष लक्ष दिले. यातून या क्षेत्रातही वेगळ्या संधी आज उपलब्ध होत आहे. पारदर्शक कार्यपद्धती आणि उद्योगांना पोषक वातावरण यामुळे गुंतवणुकीला चालना मिळते, असे सांगताना त्यांनी पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामकाजाचा उल्लेख केला. डेटा सेंटर आणि त्यांच्याशी निगडित पूरक उद्योगांमधील संधींचाही युवकांनी विचार करावा, असे ते म्हणाले. तरुणांनी व्यसनांपासून दूर राहून आपल्या ऊर्जेला रोजगार, नवोपक्रम आणि देशसेवेची दिशा द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविकात आमदार शंकर जगताप म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सुरु असलेल्या सेवाभावी उपक्रमांच्या पार्श्वभूमीवर हा महाकुंभ आयोजित करण्यात आला आहे. हा केवळ नोकरी मेळावा नसून तरुणांची स्वप्ने व क्षमता उद्योगांच्या गरजांशी जोडणारे व्यासपीठ आहे. उद्योगांना कुशल मनुष्यबळ मिळत नाही आणि पात्र युवकांना योग्य नोकरी मिळत नाही, ही दरी कमी करण्यासाठी युवक, कंपन्या, औद्योगिक आस्थापना, प्रशिक्षण संस्था आणि शासन यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी सांगितले.

'डोअर स्टेप एम्प्लॉयमेंट'च्या संकल्पनेतून रोजगाराच्या संधी तरुणांजवळ नेल्या जात आहेत. या संदर्भात जगताप यांनी राज्यातील 500 हून अधिक रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राइव्ह, तसेच पुणे जिल्ह्यातील 30 शैक्षणिक संस्थांमधील मेळाव्यांचा उल्लेख केला. महिला, दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल युवकांना विशेष संधी मिळाव्यात, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. पहिल्या मुलाखतीत यश न आल्यास निराश न होता आपल्या कमतरता ओळखून कौशल्य वाढवावे; मोबाईलचा उपयोग शिक्षण, रोजगार शोध आणि उद्योगनिर्मितीसाठी करावा, असा सल्ला त्यांनी युवकांना दिला. सुरुवातीला मिळणारी संधी स्वीकारून अनुभवाच्या बळावर पुढे जाण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या संयोजनासाठी मनोजकुमार मारकड, भारत मदने यांनी पुढाकार घेतला . सहभागी सर्व युवक-युवतींना आयोजकांच्या वतीने विशेष 'सहभाग प्रमाणपत्र' देऊन गौरवण्यात आले. सूत्रसंचालन अक्षय मोरे यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रशांत शितोळे यांनी मानले.

### दिव्यांग बांधवांसाठी प्रवेशद्वारावरच मुलाखत!

रोजगार महाकुंभात दिव्यांग उमेदवारांसाठी देखील संधी उपलब्ध करून देण्यात आली होती . याच वेळी एका दिव्यांग उमेदवाराची मुलाखत घेण्यासाठी अधिकारी स्वतः कार्यक्रमाच्या प्रवेशद्वारापर्यंत गेले.

तेथेच मुलाखत घेऊन त्या उमेदवाराची निवड करण्यात आली आणि त्याला रोजगाराची संधी मिळाली. संधी उमेदवारापर्यंत पोहोचवण्याचा हा प्रसंग मेळाव्यात विशेष ठरला. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी देखील या गोष्टीचे कौतुक केले.

> "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेला आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रोजगाराभिमुख दृष्टिकोनाला बळ देण्याचा आमचा प्रयत्न आहे.
>
> दिव्यांग बांधवांसह प्रत्येक पात्र तरुणापर्यंत रोजगाराची संधी पोहोचावी, यासाठी हा रोजगार महाकुंभ आयोजित केला .
>
> तरुणांच्या कौशल्याला योग्य संधी मिळाली, तर नक्कीच सक्षम राष्ट्रनिर्मितीचा पाया रचला जाईल."
>
> • **शंकर जगताप** : आमदार चिंचवड विधानसभा मतदारसंघ



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 30/09/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# कामगारांना न्याय देण्याचे काम पंतप्रधान मोदींनी केले - रवींद्र चव्हाण

## चिंचवड मध्ये माथाडी पदाधिकारी राज्यस्तरीय मेळावा संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : जुन्या कामगार कायद्यामुळे भांडवलशाही मंडळी कामगारांना अडचणीत आणण्याचे प्रयत्न करीत होती. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुधारणा करून कामगारांना न्याय देण्याचे काम केले आहे. नवीन कामगार कायद्यातून कामगारांना त्यांच्या कुटुंबीयांना भविष्य निर्वाह निधी, आभा कार्डद्वारे पूर्ण कुटुंबासाठी आरोग्य विमा लाभ यासह अनेक सुविधा मिळणे आता सुलभ झाले आहे. या कायद्याच्या चौकटीत कामगारांना संरक्षण मिळत आहे. अनुप मोरे यांच्या नेतृत्वाखाली माथाडी संघटनेच्या राष्ट्रमातेचा समावेश असणारा लोगो हा राष्ट्र प्रथम हे कर्तव्य दर्शवणारा आहे. या संघटनेचे 50 हजार सदस्य नोंदणीचे ध्येय पूर्ण होण्यासाठी भारतीय जनता पार्टी कामगारांच्या पाठीशी पूर्ण ताकतीने उभी राहील असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी चिंचवड येथे केले.**




भारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक, जनरल कामगार युनियन (रजि.) या संस्थेचा राज्यस्तरीय पदाधिकारी मेळावा मंगळवारी (दि. 29) चिंचवड येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी पिंपरी चिंचवडचे महापौर रवि लांडगे, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश दादा लांडगे, शंकर जगताप, उमाताई खापरे, पक्षनेते प्रशांत शितोळे, उपमहापौर शर्मिलाताई बाबर, माजी उपमहापौर व ज्येष्ठ नगरसेवक तुषार हिंगे, अध्यक्ष विजय हरगुडे, जयदीप खापरे, नगराध्यक्ष संतोष दाभाडे, अक्षय वरघडे, राकेश सणस, वसीम शेख आदींसह हजारो माथाडी कामगार उपस्थित होते. यावेळी नवीन निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला.

रवींद्र चव्हाण पुढे म्हणाले की, अनुप मोरे सारखा युवा कार्यकर्ता राज्यात माथाडी कामगारांचे नेतृत्व सक्षमपणे करीत आहे. अल्पावधीत या कामगार संस्थेचे 15 हजार सदस्य नोंदणी केली आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कामगारांनी कामगारांच्या कुटुंबीयांच्या हितासाठी निर्णय घेत आहेत. देशात मोदी यांच्या नेतृत्वाखाली विविध योजनांच्या माध्यमातून 25 कोटींपेक्षा अधिक नागरिकांना दारिद्र्य रेषेतून बाहेर काढण्याचे काम केले आहे.

भारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक, जनरल कामगार युनियन (रजि.) या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अनुप मोरे यांनी स्वागत करताना सांगितले की, ही संघटना पक्षाच्या ध्येय धोरणानुसार 2014 मध्ये स्थापन केली आहे.

या माथाडी युनियन चे महाराष्ट्रात 15 हजार सदस्य सभासद झाले आहेत.

2029 मध्ये राज्यात आणि देशात भाजपची सत्ता आणण्यासाठी माथाडी युनियनचे 50 हजार सभासद नोंदणीचे ध्येय ठेवून काम करीत आहे असे वचन अनुप मोरे यांनी कामगारांच्या साक्षीने महाराष्ट्र भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना दिले तसेच राज्यात आणि केंद्रात भाजपची सत्ता येण्यासाठी कामगारांनी तुम्ही आमच्या पाठीशी राहावे असे कामगारांना आवाहन केले. कामगारांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरवू कसा शब्द दिला.

नेत्यांनी मला प्रदेश पातळीवर काम करण्याची संधी दिली याचे सोने करून कामगारांच्या न्यायासाठी लढत राहू असेही अनुप मोरे म्हणाले.

प्रास्ताविक ॲड. विजय हरगुडे, सूत्रसंचालन अक्षय मोरे आभार संतोष कांबळे यांनी मानले.

# पिंपरी- चिंचवड राष्ट्रवादी कॉँग्रेस शहर - जिल्हा अध्यक्षपदी देवेंद्र तायडे यांची नियुक्ती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पिंपरी- चिंचवड शहर - जिल्हा अध्यक्षपदी देवेंद्र तायडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष पद्मविभूषण खासदार शरद पवार साहेब यांच्या मान्यतेने आणि शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या सूचनेनुसार, प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांनी आज श्री. देवेंद्र तायडे यांची नियुक्ती केली, अशी माहिती पक्षाचे प्रदेश सरचिटणीस व पिंपरी- चिंचवडचे पक्ष निरीक्षक सुनील माने यांनी दिली.**

पक्षाच्या मुंबईतील मुख्यालयात प्रदेश सरचिटणीस रविंद्र पवार यांनी त्यांना आज नियुक्तीचे पत्र दिले.

याबाबत बोलताना ते म्हणाले, लोकनेते शरदचंद्र पवार साहेबांच्या नेतृत्वावर आणि विचारांवर विश्वास असलेल्या पिंपरी चिंचवड शहराच्या शहराध्यक्षपदाची जबाबदारी पक्षाने संघटनात्मक अनुभव असलेल्या श्री. देवेंद्र तायडे यांच्यासारख्या चळवळीतून पुढे आलेल्या कार्यकर्त्यावर सोपविली आहे.

त्यांच्या नियुक्तीमुळे पिंपरी चिंचवड शहर व जिल्ह्यात पक्ष संघटनेला नवी दिशा प्राप्त होईल. त्यांच्या नेतृत्वात आगामी काळात पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबुत होऊन कार्यकर्ते आणखी जोमाने पिंपरी चिंचवडच्या विविध प्रश्नांवर प्रभावीपणे काम करतील.

पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा खासदार सुप्रियाताई सुळे, प्रदेश सरचिटणीस व आमदार रोहित पवार आणि वरिष्ठ नेते, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा करून पक्ष संघटना वाढीसाठी याबाबत निर्णय घेण्यात आला आहे, असे माने यांनी सांगितले.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 30/09/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिंपरी-चिंचवड 'एज्युकेशन हब'च्या संकल्पाला आता संशोधनाची जोड!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवडला 'एज्युकेशन हब' बनवण्याच्या संकल्पाला आता प्रगत संशोधनाची जोड मिळणार आहे. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि जेएसडब्ल्यू प्रोजेक्ट्स यांच्यात चिखली येथील रिसर्च पार्कमध्ये स्वदेशी बॅटरी संशोधन व विकास केंद्र उभारण्यासाठी सामंजस्य करार झाला आहे. 800 कोटींहून अधिक गुंतवणूक प्रस्तावित असलेल्या या प्रकल्पाचे भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी स्वागत केले आहे.**






मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात उद्योग, संशोधन आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत असल्याचे लांडगे यांनी म्हटले आहे. चिखलीतील हा प्रकल्प पिंपरी-चिंचवडच्या शैक्षणिक आणि औद्योगिक क्षमतेला नवी दिशा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. करारावर सीओईपीतर्फे कुलसचिव डॉ. डी. एन. सोनावणे आणि जेएसडब्ल्यू समूहातर्फे कार्यकारी उपाध्यक्ष नरेश ललवाणी यांनी स्वाक्षऱ्या केल्या. प्रस्तावित केंद्रात लिथियम-आयन, सोडिअम-आयन आणि इतर प्रगत तंत्रज्ञानावर आधारित बॅटरी सेलचे संशोधन, प्रोटोटायपिंग व प्रमाणीकरण होणार आहे. केंद्र दोन टप्प्यांत विकसित करण्याचे नियोजन असून, त्यातून एक हजार रोजगारसंधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांना आणि युवा अभियंत्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानावर प्रत्यक्ष काम करण्याची संधीही उपलब्ध होऊ शकते. या भागीदारीबाबत जेएसडब्ल्यू समूहाचे अध्यक्ष सज्जन जिंदाल यांनी, "सेल हे या शतकातील नवीन इंधन असून हे सेल भारतातच तयार करण्याची वेळ आली आहे," असे म्हटले आहे. सीओईपीसोबतची भागीदारी उद्योग, संशोधन आणि शिक्षण क्षेत्राला नवा आयाम देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

पिंपरी-चिंचवडला 'एज्युकेशन हब' म्हणून विकसित करण्याचा संकल्प आपण केला असल्याचे आमदार लांडगे यांनी सांगितले. जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपीठ तसेच सीओईपी आणि आयआयएम नागपूरच्या शैक्षणिक संधी शहरात उपलब्ध व्हाव्यात यासाठी सुरु असलेल्या प्रयत्नांचा त्यांनी उल्लेख केला. आता चिखलीतील बॅटरी संशोधन केंद्रामुळे या संकल्पात उद्योगाशी जोडलेल्या संशोधनाची भर पडणार असल्याचे त्यांनी नमूद केले. स्वदेशी बॅटरी तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी झालेल्या भागीदारीबद्दल लांडगे यांनी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आणि जेएसडब्ल्यू प्रोजेक्ट्सचे अभिनंदन केले. प्रस्तावित गुंतवणुकीतून दर्जेदार संशोधन, कौशल्यविकास आणि स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# एसबीपीसीओएडी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : आंतरराष्ट्रीय स्तरावर वास्तुविशारद क्षेत्रात मोठ्या प्रमाणात स्पर्धा आहे. तरीही भारतात वास्तुविशारद क्षेत्रात अनेक संधी देखील उपलब्ध आहेत. जिथे कमतरता असते तिथे संधी उपलब्ध होते याचा उपयोग करून घेऊन आपले करिअर घडवावे असे मार्गदर्शन ज्येष्ठ वास्तुविशारद व आंतरराष्ट्रीय लँडस्केप डिझाईनर डॉ. महेश नामपुरकर यांनी केले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईन (एसबीपीसीओएडी) मध्ये 2025 - 26 मधील बॅचलर ऑफ आर्किटेक्चरच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट पुणे सेंटर चेअरमन आर्किटेक्ट शितेश अग्रवाल, एसबीपीसीओएडी प्राचार्या डॉ. स्मिता सूर्यवंशी, यशस्वी विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

नामपूरकर यांनी सांगितले की, वास्तुशास्त्र हा एक अतिशय सुंदर व्यवसाय आहे. विद्यार्थ्यांनी शिकण्याची आणि जे हवे आहे ते साध्य करण्याची जिद्द बाळगायला हवी. हे क्षेत्र तुम्हाला स्वातंत्र्य आणि सामर्थ्य देते. तसेच, तुम्हाला कुठे स्थायिक व्हायचे आहे, याची निवड करण्याचे स्वातंत्र्य आणि आत्मविश्वास मिळतो. देशसेवा करण्याचे हे एक चांगले क्षेत्र आहे.

यावेळी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. माजी विद्यार्थिनी आर्किटेक्ट हरश्री नखरानी यांना 2025 या वर्षातील सर्वोत्तम विद्यार्थी प्रेरणा चषक देऊन गौरवण्यात आले. तसेच एमपीएससी स्पर्धा परीक्षेत असिस्टंट टाऊन प्लॅनर म्हणून निवड झाल्याबद्दल काजल थिटे, फोएड यंग वुमन अचीवर ऑफ द इयर हॉस्पिटलिटी साठी अंकिता पाटील, स्ट्राइड मेक स्पेस डिझाईन कॉम्पिटिशन मध्ये तिशा केला आणि आदर्श प्रधान तसेच पर्यावरण, शाश्वतता, वादविवाद पोस्टर डिझाईन बर्ड हाऊस डिझाईन आणि फोटोग्राफी मध्ये ओमकुमार बागले, जानवी भोसले, दिशा प्रधान, सिद्धी सावंत, भार्गवी पोहणे, आदित्य काळे, कृतिका चनी, प्रतिभा काकडे, सानिका काळे या बक्षीस विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. कॅम्प फोटोग्राफी मध्ये प्रथम क्रमांक राधिका मंत्री, द्वितीय क्रमांक सानिका सुतार, तृतीय क्रमांक संदली मेंढळकर, विशेष सहभागासाठी मृदुल मारळ, मृण्मयी चौधरी, ऐश्वर्या जाधव यांचाही गौरव करण्यात आला. स्कार्स ऑफ इंडिया - द अनटोल्ड बॅटल्स या पुस्तकासाठी स्वरा मुसळे, कलर्स ऑफ धर्म या कलरिंग बुक साठी गार्गी साठे यांना बक्षीस देण्यात आले.

शैक्षणिक वर्ष 2025 - 26 मधील 43 गुणवंत विद्यार्थी आणि विविध क्षेत्रात यश मिळवलेल्या माजी विद्यार्थ्यांचा देखील सत्कार करण्यात आला.

तसेच 2026-27 च्या विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष अमोद भेगडे, उपाध्यक्ष मृण्मयी चौधरी, सचिव कुशा गोयल, सांस्कृतिक प्रमुख सायली केसकर, क्रीडा प्रमुख मृदुल मारळ व विविध क्लब मध्ये निवड झालेल्या पदाधिकारी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 30/09/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# 2.77 कोटींच्या एक्स-रे मशीन खरेदीवरून महापालिकेत खळबळ!

## संदीप वाघेरे यांची आयुक्तांकडे निविदा रद्द करण्याची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय साहित्य खरेदीसाठी काढण्यात आलेल्या GeM निविदा क्र. GEM/2026/B/7797530 मधील 1000 MA Digital Radiography System च्या खरेदीवरून आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या मशीनसाठी महापालिकेने तब्बल 2 कोटी 77 लाख 56 हजार रुपयांचे अंदाजपत्रकीय मूल्य निश्चित केले असून, बाजारातील तसेच इतर शासकीय संस्थांमधील खरेदी दरांच्या तुलनेत ही रक्कम मोठी असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले आहे. नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य संदीप वाघेरे यांच्या वतीने महापालिका आयुक्तांना याबाबत पत्र देण्यात आले आहे.**



संबंधित निविदा प्रक्रिया तातडीने थांबवून रद्द करावी, तसेच संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

पत्रात नमूद केलेल्या माहितीनुसार, निविदेतील तांत्रिक स्पेसिफिकेशनशी संबंधित मूळ उत्पादक कंपनीने राजस्थानमधील कोटा येथील वैद्यकीय महाविद्यालयाला 1000 MA क्षमतेचे याच प्रकारचे मशीन सुमारे 1 कोटी 40 लाख रुपयांना पुरविले आहे. तसेच 800 MA क्षमतेचे मशीन याच वर्षी सुमारे 1 कोटी 10 लाख रुपयांना विकण्यात आले असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. एकीकडे 1000 M A मशीनची शासकीय संस्थेतील खरेदी सुमारे 1.40 कोटी रुपयांत झाल्याचे नमूद असताना, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निविदेत त्याच क्षमतेच्या मशीनसाठी 2.77 कोटी 56 लाख रुपये इतके अंदाजित मूल्य निश्चित करण्यात आल्याने दरातील मोठ्या फरकाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

या निविदेतील तांत्रिक अटी व स्पेसिफिकेशन काही ठराविक कंपन्या किंवा पुरवठादारांना अनुकूल ठरतील अशा पद्धतीने निश्चित करण्यात आल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे निविदेतील प्रत्येक तांत्रिक निकष, अंदाजपत्रकीय दर आणि त्यासाठी वापरण्यात आलेला बाजारभाव यांची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच संबंधित उत्पादक कंपनीच्या काही सरकारी संस्थांमधील विक्री व्यवहारांबाबत तपास यंत्रणांकडून चौकशी सुरु असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने सदर खरेदी प्रक्रियेबाबत अधिक दक्षता घेण्याची मागणी करण्यात आली आहे. महापालिकेच्या सार्वजनिक निधीतून कोट्यवधी रुपयांची खरेदी होत असल्याने निविदा प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, स्पर्धात्मक आणि बाजारभावाच्या आधारे असणे आवश्यक आहे. त्यामुळे GEM/2026/B/7797530 ही निविदा तत्काळ स्थगित करुन रद्द करावी, संबंधित मशीनचे पूर्वीचे शासकीय खरेदी दर तपासावेत आणि नव्याने बाजारभाव निश्चित करूनच पुढील खरेदी प्रक्रिया राबवावी, अशी मागणी संदीप वाघेरे यांनी केली आहे.

या प्रकरणात महापालिका प्रशासन आता कोणती भूमिका घेते आणि 2.77 कोटी रुपयांच्या अंदाजित दराचे समर्थन कोणत्या आधारावर केले जाते, याकडे शहराचे लक्ष लागले आहे.

# मोशीत 4 ऑक्टोबरला पुन्हा घुमणार हजारो ढोल-ताशांचा निनाद!

**- 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'ला ऐतिहासिक मानवंदना देण्याचा संकल्प**

**- ढोल-ताशा महासंघ, हिंदूभूषण स्मारक ट्रस्टचा संयुक्त उपक्रम**

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच पुतळा "स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण" ला ऐतिहासिक मानवंदना देण्याकरिता गतवर्षी मोशीत ढोल-ताशांचा विश्वविक्रमी निवाद करण्यात आला.**

**यावर्षी पुन्हा एकदा या गगनभेदी सोहळ्याने शिव-शंभू विचारांचा गजर होणार आहे. "रणवाद्य" म्हणून हिंदवी स्वराज्याच्या इतिहासाची साक्ष असलेले ढोल-ताशा पथके यासाठी महाराष्ट्रभरातून पिंपरी-चिंचवडमध्ये दाखल होणार आहेत.**

रविवार, 4 ऑक्टोबर 2026 रोजी दुपारी 2 वाजता बोऱ्हाडेवाडी, मोशी येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रात हा सोहळा होणार आहे.

आयोजित पत्रकार परिषदेत आयोजकांनी ही माहिती दिली. हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड आणि ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम होणार आहे.

यंदा पाच हजारांहून अधिक ढोलवादकांची नोंदणी पूर्ण झाल्याचे आयोजकांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

विविध पथकांच्या सामूहिक वादनातून विश्वविक्रम नोंदवण्याचा त्यांचा संकल्प आहे. विक्रमाची अधिकृत पुष्टी कार्यक्रमानंतर होईल.

तसेच, पिंपरी-चिंचवडमध्ये उभारण्यात येत असलेल्या 128 मीटर उंच भगव्या ध्वजासही या सोहळ्यात मानवंदना देण्यात येणार आहे. हा जगातील सर्वांत उंच भगवा ध्वज म्हणून ओळखला जाणार आहे.

गतवर्षीच्या सोहळ्यानंतर यंदा अधिकाधिक ढोल-ताशा पथकांना एकत्र आणण्यासाठी तयारी सुरु असल्याची माहितीही आयोजकांनी दिली.

पत्रकार परिषदेला ढोल-ताशा महासंघाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष पराग ठाकूर, पुणे अध्यक्ष अक्षय बलकवडे, पिंपरी-चिंचवड अध्यक्ष विशाल मानकर, हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे उपाध्यक्ष गणेश महाराज भुजबळ आणि सदस्य प्रशांत वायकर उपस्थित होते.

नागरिकांनी सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले.

**"गतवर्षी झालेल्या ऐतिहासिक मानवंदनेची आठवण आजही ढोल-ताशा पथकांच्या मनात ताजी आहे.**

**यंदा पाच हजारांहून अधिक वादक एकत्र येऊन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना मानवंदना देण्यासाठी सज्ज आहेत. सर्व पथकांचा एकत्रित निनाद हा या सोहळ्याचा सर्वांत महत्त्वाचा क्षण असेल."**

**— पराग ठाकूर, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष, ढोल-ताशा महासंघ.**

**"धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या गौरवशाली स्मृतींना वंदन करण्यासाठी आणि निर्माणाधीन 'धर्मध्वज'ला ऐतिहासिक मानवंदना देण्यासाठी सोहळ्याचे आयोजन केले आहे.**

**गतवर्षीप्रमाणे यंदाही शिव-शंभूप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. 128 मीटर उंच उभारण्यात येत असलेल्या जगातील सर्वांत उंच भगव्या ध्वजास हजारो ढोलवादकांच्या उपस्थितीत विश्वविक्रमी मानवंदना देण्याचा आमचा संकल्प आहे."**

**— गणेश महाराज भुजबळ, उपाध्यक्ष, हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट.**



बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968